# 'आभार व मनोगत '

## [ A C K N O W L E D G E M E N T ]

मी, सर्वात प्रथम डॉ. ए.डी.माडगूळकर ( प्रपाठक आणि समाजशास्त्र व सामाजिक कार्य विभाग प्रमुख, छ. शाहू सेन्ट्रल इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँड रिसर्च, कोल्हापूर ) यांचे मनःपूर्वक आभार मानते. या शोध प्रबंधासाठी त्यांचे अमूल्य, समर्थ व विधायक, चिकित्सक मार्गदर्शन लाभले. त्यांचे सहकार्य व प्रोत्साहन यासाठी मी त्यांची आजन्म ऋणी राहीन.

मी, डायरेक्टर, ए.डी.शिंदे व प्राचार्य डॉ. पी. सुब्बाराव (छ.शाहू सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँड रिसर्च, कोल्हापूर ) यांनी मला हे संशोधन कार्य करण्याची संधी दिली याबद्दल त्यांचे आभार मानते. माझे गुरूवर्य श्री. शाम येडेकर व सौ. मंगला येडेकर यांनी माझ्या शोध प्रबंधासाठी मला जी वेळोवेळी मदत केली त्याबद्दल मी त्यांची कायमची ऋणी आहे.

महिला महाविद्यालय, उंब्रजचे प्राचार्य श्री. इ.जी.निकम व महिला महाविद्यालय सातारचे प्राचार्य श्री. टी.इ. शेळके, माझे सहकारी बंधु प्राध्यापक श्री पाटील टी.एस. यांच्या बहुमूल्य मार्गदर्शनाबद्दल मी त्यांची आभारी आहे. माझे सहकारी बंधु प्राध्यापक सुकुमार शेटे, प्राध्यापक वामन पाटील, प्रा. आर.ए.पाटील, माझ्या व्यावसायिक भगिनी प्राध्यापिका सौ. शैला माने, प्राध्यापिका सौ. पठाण आर ए, प्राध्यापिका पाटील एम आर, प्रा. कोडोलीकर यांनी माझ्या अभ्यास कार्यास मदत व प्रोत्साहन दिल्याबद्दल मी त्यांची मनःपूर्वक आभारी आहे.

वैदु जमातीचे सामाजिक कार्यकर्ते श्री यल्लप्पा वैदू, श्री उत्तम शिर्के, श्री रमेश वैदू व या सर्वांचे कुटुंबिय यांनी वैदू जमातीबद्दल तथ्य संकलन करताना जी बहुमूल्य मदत केली, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते.

छ. शिवाजी कॉलेज - ग्रंथालय - सेवक वर्ग सातारा, नगरपालिका वाचनालय सेवक वर्ग, सातारा, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, छ.शाहू इन्स्टिटयूट ग्रंथालय सेवक वर्ग कोल्हापूर व छ. शाहू इन्स्टिटयूट ग्रंथालय सेवक वर्ग पुणे या सर्वांनी दुर्मिळ ग्रंथ देऊन बहुमूल्य मदत केल्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

माझे मेहुणे श्री जयसिंग गायकवाड व बहीण सौ. जयमाला गायकवाड, यांनी या शोध प्रबंधासाठी मला सक्रीय मदत व प्रोत्साहन दिले याबद्दल मी त्यांची आजन्म ऋणी राहीन. याशिवाय माझे सासरे श्री एम डी शिंदे, सासूबाई सौ. मथुरा शिंदे, वडील श्री एम डी चव्हाण, आई सौ. यशोदा चव्हाण, चुलते श्री डी डी चव्हाण यांनी मला या कार्यासाठी सतत प्रोत्साहन दिले. माझी मुले विक्रम व रश्मी यांनी संशोधन कार्यासाठी मला पुरेसा वेळ दिला. या सर्वांच्या सदिच्छा व सहकार्य यामुळेच मी हा शोध प्रबंध पूर्ण करू शकले.

**********************